# जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, सिंधुदुर्ग

मुख्य प्रशासकीय इमारत, पहिला मजला, सिंधुदुर्गनगरी, ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग - 416812

(आस्थापना-शाखा)

दूरध्वनी क्रमांक 02362-229000 ईमेल-estsindhudurg@gmail.com


आदेश क्र. आस्था/तलाठी नियुक्ती/03/2024 दिनांक 14.03.2024

**वाचले :-**

1.शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही-1097/प्रक्र.31/28/16-ब दि.16.03.1999

2. शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग, क्र.82/2001/मसंआ-2000/प्र.क्र.415/का-2 दि.25.05.2001

3. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.प्रानिमं 1216/प्रक्र.65/16/13-अ दि.13.06.2018

4. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक बीसीसी-2018/प्र.क्र.581ए/2018/16-ब दि.05.12.2018

5. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक राआधो-4019/प्र.क्र.31/16-अ दि.12.02.2019

6. शासन पत्र, महसूल व वन विभाग क्रं. तलाठी -2017/प्र.क्र.461/ई-10 दि.25.02.2019

7. राज्य परिक्षक समन्वयक तथा अपर जमाबंदी आयुक्त आणि अति.संचालक भूमी अभिलेख (महाराष्ट्र राज्य) पुणे यांची जाहिरात क्रमांक तलाठी भरती /प्र.क्र.45/2023 दिनांक 26.06.2023

8. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी-2018/प्र.क्र.518 ए/16-ब दि.04.07.2019

## "आदेश"

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाअंतर्गत जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख (महाराष्ट्र राज्य) पुणे कार्यालयाकडून TCS कंपनीमार्फत सिंधुदुर्ग जिल्हयातील 145 तलाठयांची रिक्त पदे भरण्यासाठी दिनांक 17.08.2023 ते दिनांक 14.09.2023 या कालावधीत ऑनलाईन (Computer Based Test) परीक्षा घेण्यात आली. प्रभारी राज्य परीक्षा समन्वयक तथा अपर जमाबंदी आयुक्त, आणि अतिरिक्त संचालक भूमि अभिलेख (महाराष्ट्र राज्य) पुणे यांनी दिनांक 12.03.2024 रोजी प्रसिध्दी पत्रकाद्वारे उमेदवारांना प्राप्त गुणांवर सामान्यीकरण प्रक्रिया पूर्ण करुन सिंधुदुर्ग जिल्हयाची सर्वसाधारण गुणवत्ता यादी प्रसिध्द करण्यात आली आहे. त्यानुसार सुधारीत निवड यादी व सुधारीत प्रतिक्षा यादी दिनांक 14.03.2024 रोजी प्रसिध्द करण्यात आली.

त्याअर्थी, जिल्हा निवड समितीने तलाठी संवर्गाच्या लेखी परिक्षेतील गुणवत्तेनुसार प्रवर्गनिहाय पात्र ठरलेल्या खालील उमेदवाराची निवड केली असून निवड केलेल्या उमेदवारांना तलाठी संवर्गात पे मॅट्रीक्स (S-8 25500-81100) या वेतनश्रेणीत तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती व पदस्थापना देण्यासाठी नियुक्ती प्राधिकारी या नात्याने आदेश निर्गमित करण्यात येत आहेत. खालील तलाठी या पदावर निवड झालेल्या उमेदवारांना निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात अटी व शर्तीच्या अधिन राहून नियुक्ती व पदस्थापना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | उमेदवाराचे नांव व संपूर्ण पत्ता | उमेदवाराचा मुळ प्रवर्ग | निवडीचा प्रवर्ग | पदस्थापनेचे साझा व तालुका |
|---|---|---|---|---|
| 1. | **श्री./श्रीम. भगवान कुशाबा मानवर रा.दांडी, 1238 बी ता.मालवण जि.सिंधुदुर्ग** | **अराखीव** | **अराखीव - सर्वसाधारण** | **तलाठी साझा तरंदळे तहसिलदार कार्यालय कणकवली** |

**अटी व शर्ती :-**

1. उपरोक्त आदेशात बदल करणेकामी उमेदवारांकडुन शासकीय/अशासकीय/राजकीय व्यक्तीव्दारे तोंडी अथवा लेखी प्रत्यक्ष / अप्रत्यक्ष दबावतंत्राचा वापर केल्यास सदरचा आदेश कोणत्याही प्रकारची पुर्व सुचना न देता रद्य केला जाईल व त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील.
2. सदर नेमणुक तात्पुरत्या स्वरुपाची आहे. ती शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या सेवाविषयक निर्णयाच्या अधिन राहुन करण्यांत येत आहे, शासन धोरणानुसार भविष्यामध्ये नोकर कपात झाल्यास याबाबत कोणतीही पुर्वसुचना न देता आपोआप सेवेतून कमी करण्यांत येईल.
3. उमेदवारास नेमणुक केलेल्या ठिकाणी आदेशाच्या दिनांकापासुन (30) दिवसाच्या आत रुजु व्हावे लागेल, रुजु न झाल्यास दिलेली नियुक्ती आपोआप रद्य समजण्यांत येईल, व प्रतिक्षा यादीतील उमेदवारांना नियमाप्रमाणे नियुक्ती देण्यांत येईल.
4. खुल्या प्रवर्गातील उमेदवार तसेच ज्या ज्या उमेदवारांकडे जात वैधता प्रमाणपत्र आहे असे उमेदवार वगळुन उर्वरित उमेदवारासाठी महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी-2011/प्रक्र-1064/2011/16 ब दिनांक 12/12/2011 मधील तरतुदीनुसार, याचिका क्र.2136/2011 व अन्य याचिकांवर मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिनांक 25/08/2011 रोजी दिलेल्या आदेशाच्या विरोधात मा.सर्वोच्च न्यायालय,नवी दिल्ली येथे दाखल केलेल्या एसएलपी मधील आदेशाच्या अधीन राहुन तात्पुरते नियुक्ती आदेश निर्गमित केल्याच्या दिनांकापासुन 06 महिन्यांचे आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे. अन्यथा उमेदवारांनी त्यांचे जात वैधता प्रमाणपत्र संबंधित जात पडताळणी समितीकडे सादर केल्याच्या तारखेपासुन सहा महिन्याचे आत सादर न केल्यास अथवा जात वैधता प्रमाणपत्र अवैध ठरल्यास त्यांचेविरुध्द नियमानुसार कार्यवाही करण्यांत येईल.
5. नेमणुकीच्या ठिकाणी रुजु होण्यासाठी प्रवास खर्च अनुज्ञेय राहणार नाही.
6. पुर्व चारित्र्याबाबत संबंधित जिल्हा पोलीस अधिक्षक यांचेकडुन चारित्र्य पडताळणी समाधानकारक असलेबाबतचे प्रमाणपत्र उमेदवारास तीन महिन्यात कार्यालय प्रमुखाकडे सादर करावे लागेल.
7. नेमणुक झाल्यापासुन तीन महिन्याच्या आत शारीरिक पात्रतेचा पुरावा म्हणुन जिल्हा शल्य चिकित्सक, सिंधुदुर्ग यांचे प्रमाणपत्र दाखल करावे लागेल.
8. नोकरीचा राजीनामा दयावयाचा झाल्यास एक महिना अगोदर लेखी सुचना द्यावी लागेल किंवा एक महिन्याचे मुळ वेतन जमा करावे लागेल.
9. उमेदवाराने जन्माचा दाखला, शैक्षणिक पात्रतेचा पुरावा, जातीचे प्रमाणपत्र, शासनमान्य संगणक अर्हता प्रमाणपत्र इ.कागदपत्रांची साक्षांकित प्रत सादर करावीत.
10. व्दिभार्या प्रतिबंधक कायदयानुसार पहिला पती/पत्नी हयात असलेल्या पुरुष/स्त्री यांच्याशी विवाह करता येणार नाही.
11. प्रामाणिकपणा तसेच गुप्ततेबाबत संबंधित कार्यालय प्रमुख यांचेकडे शपथपत्र सादर करावे लागेल.
12. उमेदवारांनी सेवेत रुजु झाल्यापासुन कमीत कमी पाच वर्षे सेवा झाल्याशिवाय खात्याच्या अन्य विभागाकडे / आंतर जिल्हा बदली / आंतर विभागीय बदली करण्यासाठी त्यांना अर्ज करता येणार नाही, याबाबतीत अर्ज केल्यास नियमानुसार कार्यवाही करण्यांत येईल.
13. शासनातर्फे वेळोवेळी घेण्यांत येणा-या विभागीय दुयम सेवा परीक्षा नियुक्तीच्या दिनांकापासुन 03 संधीत व 04 वर्षात उत्तीर्ण कराव्या लागतील. तसेच पदोन्नतीकरीता आवश्यक असलेली महसुल अर्हता परीक्षा नियमानुसार उत्तीर्ण करावी लागेल.
14. उमेदवाराने शासन निर्णयानुसार विहित केलेली संगणक अर्हता (एमएस-सीआयटी) प्रमाणपत्र रुजु दिनांकापासुन दोन वर्षाच्या आत संबंधित कार्यालय प्रमुखाकडे सादर करणे बंधनकारक राहील अन्यथा सेवा संपुष्टात आणण्यांत येईल.
15. उमेदवारास एतदर्थ मंडळाची मराठी व हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण व्हावे लागेल अथवा नियमानुसार परीक्षा उत्तीर्ण होण्यापासुन सुट मिळवावी लागेल.
16. उमेदवारास मत्ता व दायित्व यांचे विवरण परिशिष्ट (प्रथम एक, दोन तीन व चार) मध्ये अर्ज व इतर दायित्व यांचे विवरण रुजु झाल्याच्या दिनांकापासुन तीन महिन्याचे आत सादर करावे लागेल.
17. उमेदवाराने संविधानास एकनिष्ठ राहण्याचे शपथेवरील प्रतिज्ञापत्र सेवापुस्तिकेत जोडण्यासाठी सादर करावे लागेल.

18. प्रचलित शासन निर्णयानुसार कुटूंब मर्यादा प्रतिज्ञापत्र सादर करणे व कुटूंब मर्यादा ठेवणे बंधनकारक राहील.

19. उमेदवाराने महसूल व वन विभागाकडील शासन निर्णय दिनांक 24.03.2014 नुसार नमुद केलेले प्रशिक्षण विहित वेळेत पुर्ण करणे आवश्यक राहील. अन्यथा शासन निर्णयात नमुद केल्यानुसार सेवा संपुष्टात आणण्याची कार्यवाही करण्यांत येईल.

20. महाराष्ट्र शासन वित्त विभाग निर्णय दिनांक 31 ऑक्टोबर 2005 अन्वये 1 नोव्हेंबर 2005 रोजी किंवा त्यांनतर त्यांची शासकीय सेवेत नियुक्ती होताच त्यांना नविन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागु ठरेल. मात्र सद्या अस्तित्वात असलेल्या निवृत्ती वेतन योजना (म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम 1982 व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण) नियम 1984 आणि सद्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना त्यांना लागु होणार नाही.

21. उमेदवारांना अन्य कार्यालयात/विभागात नोकरीसाठी/स्पर्धा परीक्षेसाठी/अन्य कारणांसाठी नियुक्ती प्राधिका-याची परवानगी घेणे बंधनकारक राहील.

22. उमेदवारांना नियुक्ती प्राधिका-यांच्या पुर्व परवानगी शिवाय त्यांच्या व्यवसायिक अथवा इतर शैक्षणिक संस्था/शाळा/कॉलेज/विद्यापीठे येथे प्रवेश घेता येणार नाही. तसेच सदरची नेमणुक ही बिंदुनामावली प्रमाणिकरण करण्यांचे अधिन राहुन देण्यांत येत आहे.

23. उमेदवाराने सादर केलेली कागदपत्रे/प्रमाणपत्रे/दाखले भविष्यांत चुकीची/खोटी/बोगस आढळली तर सदर उमेदवाराविरुध्द फौजदारी स्वरुपाची कार्यवाही करण्यांत येऊन त्यांना सेवेतुन काढुन टाकण्यांत येईल.

24. उमेदवाराची नेमणुक ही शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या नियमाचे व अटीचे अधिन राहील.

**सही/- xxx**
**(किशोर तावडे)**
**जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग**

**प्रतिलिपी –**

1. मा.अपर मुख्य सचिव, (महसूल) महसूल व वन विभाग मंत्रालय मुंबई यांना माहितीस्तव सादर.
2. मा.अपर जमाबंदी आयुक्त आणि अतिरिक्त संचालक भूमि अभिलेख (महाराष्ट्र राज्य) पुणे यांना माहितीस्तव सादर.
3. मा.विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई यांना माहितीस्तव सादर.
4. उपविभागीय अधिकारी कणकवली / कुडाळ / सावंतवाडी यांना माहितीस्तव.
   2/- उक्त उमेदवार यांच्या नियुक्ती प्रवर्गानुसार तलाठी संवर्गाच्या बिंदू नामावलीमध्ये नोंद घ्यावी, व नवनियुक्त तलाठी यांना नियुक्तीनंतरचे प्रशिक्षण देणेबाबतची कार्यवाही करावी.
5. तहसिलदार (सर्व) यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव.
6. जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन अधिकारी सिंधुदुर्ग यांना माहितीस्तव.
7. शाखा प्रमुख-आस्थापना / लेखा शाखा यांना माहितीस्तव
8. आदेश संचिका

जिल्हाधिकारी सत्यमेव जयते सिंधुदुर्ग

(किशोर तावडे)
जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग